# ‘नियमित प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय,उस्मानाबाद.
**मंगळवार दि.१४/०२/२०२३**

## “मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई.”

उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि. १३ फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी **एकुण २०१ कारवाया करुन १,२५,२०० ₹ ‘तडजोड शुल्क’ वसुल केले आहे.**

## “ अवैध मद्य विरोधी कारवाई .”

**तुळजापूर पोलीस ठाणे :** मातंगनगर, तुळजापूर येथील- अशिष मणिकराव लोंढे हे दि.१३.०२.२०२३ रोजी १२.४५ वा. सु. तुळजापूर येथील हडको मैदानजवळ अंदाजे ९८० ₹ किंमतीची देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना तुळजापूर पो.ठा. च्या पथकास आढळले.

**मुरुम पोलीस ठाणे :** आलुर, ता. उमरबा येथील- गणेश इंगळे हे दि.१३.०२.२०२३ रोजी १७.४० वा. सु. अक्कलकोट जाणारे रोडलगत देशेट्टे यांच्या दुकानासमोर अंदाजे २,४०० ₹ किंमतीची १२ लि. गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना मुरुम पो.ठा. च्या पथकास आढळले.

## “ जुगार विरोधी कारवाई.”

**परंडा पोलीस ठाणे :** जुगार विरोधी कारवाई दरम्यान परंडा पोलीसांनी दि.१३.०२.२०२३ रोजी १८.३० वा. सु. परंडा पो.ठा.हद्दीत छापा टाकला. यावेळी भिमनगर, परंडा येथील- प्रविण वाघचौरे हे कुह्राड गल्ली भोत्रा रोड पत्र्याचे शेडमध्ये परंडा येथे चक्री जुगार चालवण्याच्या साहित्यासह ४,५०० ₹ रक्कम बाळगलेले आढळले.

**तामलवाडी पोलीस ठाणे :** जुगार विरोधी कारवाई दरम्यान तामलवाडी पोलीसांनी दि.१३.०२.२०२३ रोजी १७.३० वा. सु. तामलवाडी पो.ठा.हद्दीत छापा टाकला. यावेळी सावरगांव, ता. तुळजापूर येथील- सचिन डोलारे, बबन कदम, बिभीषन सेलारे, कालीदास डोलारे,महादेव शिंदे, ज्ञानदेव मुळे हे सर्व नागोबा मंदीराच्या पाठीमागे मोकळ्या जागेत तिरट मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह २,६५० ₹ रक्कम बाळगलेले आढळले.

यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अंतर्गत सबंधीत पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## “रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यावर गुन्हा नोंद.”

**उमरगा पोलीस ठाणे :**तुरोरी, ता. उमरगा येथील- उमेश जाधव, तर शिरसल, ता. औसा येथील ज्येतीराम हांडे या दोघांनी दि. १३.०२.२०२३ रोजी १९.१५ वा. सु. आपापल्या ताब्यातील अनुक्रमे महिंद्रा मिनी व्हॅन क्र. एम.एच. २५ आर ८९५४ व महिंद्रा मिनी व्हॅन क्र. एम.एच. २५ एस ९२३७ ही वाहने उमरगा येथे बसस्थानका समोरील जाणारे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायरीत्या उभे केलेले असताना उमरगा पोलीसांना आढळले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.द.स. कलम २८३ अंतर्गत उमरगा पो.ठा. येथे २ गुन्हे नोंदवले आहेत.

**" लोकसेवकाच्या कर्तव्यात अडथळा करणाऱ्यावर गुन्हा दाखल."**

**कळंब पोलीस ठाणे :** नवनाथ दत्तोबा खांडेकर, पोलीस अंमलदार/१७८२ नेमणुक उपविभागीय पोलीस कार्यालय कळंब हे व सोबत इतर अंमलदार दि. १२.०२.२०२३ रोजी १९.४५ वा. सु. कळंब शहरात वाहतुकीचे नियमन करीत असताना भिमनगर, कळंब येथील- सम्राट ऊर्फ संभाजी मच्छींद्र गायकवाड व अन्य २ यांनी संगणमताने रोडवर लावलेल्या गाड्या काढून घ्या रहदारीस अडथळा होत आहे. असे म्हणताच संभाजी यांने नवनाथ यांच्याशी हुज्जत घालून, अरेरावीची, असभ्य भाषा करुन वाद घालून लाथाबुक्यांनी गळ्यावर छातीवर नखाने मारहान करून दुखापत केली. तसेच शासकिय कामात अडथळा निर्माण केला. जिवे मारण्याची धमकी दिली. यावरुन पोलीस अंमलदार नवनाथ खांडेकर यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३५३, ३३२, ३२३, ५०४, ५०६, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**" नुकसान करणे."**

**भुम पोलीस ठाणे :** प्रमोद चोखोबा कांबळे रा लक्ष्मीनगर ता. भुम यांचा गावकरी स्वप्नील हावळे यांने दि. १२.०२.२०२३ रोजी .०२.०० वा. सु. प्रमोद चोखोबा कांबळे यांच्या रविंद्र शाळेजवळ लक्ष्मीनगर येथील किराणा दुकानाला नुकसान होण्याचे दृष्ट उद्देशाने आग लावून जाळून टाकले यात प्रमोद यांचे अंदाजे २,००,००० ₹ चे नुकसान झाले. अशा मजकुराच्या प्रमोद कांबळे यांनी दि. १३.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४३५ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**"इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणांऱ्या गुन्हा दाखल."**

**ढोकी पोलीस ठाणे :**कोळेवाडी, ता, उस्मानाबाद येथील- सुरज आकोसर, समाधान आकोसकर, ज्ञानोबा तात्या आदटराव, सुजितकुमार राउत,भारत आकोसकर,रामकिसन आकोसकर, अन्य १५ यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या कोळेवाडी मंडळ पंचवार्षीक निवडणूक २०२३-२०२८ चि निवडणुक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळेवाडी येथे चालू असताना दि.१२.०२.२०२३ रोजी ११.३० वा. सु. कोळेवाडी ते डकवाडी जाणारे रोडचे बाजूला लिंबाच्या झाडाखाली नमूद इसमांनी एकत्रीत येउन एकमेकांना शिवीगाळ करुन मारहान केली.इतरांचे जिवीतास व व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल दंगल करुन एकमेकांना मारहान करुन दुखापत केली. सार्वजनिक शांतता भंग केली. यावरुन ढोकी पो.ठा. चे पोलीस अंमलदार महेश व्यंकटराव शिंदे यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- १६०, ३३६, ३३७ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**" मालमत्तेविरुध्द गुन्हे."**

**बेबंळी पोलीस ठाणे :** धारुर, ता. उस्मानाबाद येथील- प्रदिप बळीराम शिंदे यांची अंदाजे ४०,००० ₹ किंमतीची होन्डां शाईन मोटारसायकल क्र.एम.एच.२५ एटी ७७२६ ही दि.११.०२.२०२३ रोजी २१.०० ते दि. १२.०२.२०२३ रोजी ०५.००वा. दरम्यान शिंदे यांचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या प्रदिप शिंदे यांनी दि. १३.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे

**आनंदनगर पोलीस ठाणे :** सुर्डी, ता. उस्मानाबाद येथील- दिपक आत्माराम झांबरे यांची अंदाजे १०,००० ₹ किंमतीची मोटारसायकल क्र.एम.एच.२५ एट ७३११ ही दि.१०.०२.२०२३ रोजी १९.३० वा. दरम्यान तुळजाभवानी स्टेडिअम उस्मानाबाद येथील पार्किंग मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या दिपक झांबरे यांनी दि. १३.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे

## " रस्ता अपघात."

**तुळजापूर पोलीस ठाणे :** आरळी (खु), ता. तुळजापूर येथील- विजय महादेव लोहार, वय ६५ वर्षे, हे दि. १२.०२.२०२३ रोजी १३.३० ते १३.४५ वा. सु. बसस्थानक तुळजापूर समोरील तुळजापूर ते लातूर जाणारे रोडवर मोटार सायकलवर बसून जात होते. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील आयशर वाहन क्र एमएच. १३ डीक्यु १७८२ ही निष्काळजीपने चालवल्याने विजय यांच्या मोटर सायकलला पाठीमागून धडक दिली. यात विजय हे गंभीर जखमी होउन मयत झाले. तर आलका विजय लोहार ह्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या अपघातानंतर अज्ञात वाहन चालक अपघात स्थळावरुन पसार झाला. अशा मजकुराच्या मयताचा मुलगा- सचिन विजय लोहार यांनी दि. १३.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३८, ३०४ (अ), सह मो.वा.का. कलम- १८४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

---

जनसंपर्क विभाग उस्मानाबाद पोलीस